MHKO100004922019

# आदेश
## (निशाणी ५ वरील)

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ नुसार प्रतिवादींचे विरुध्द तुर्तातुर्त ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. <u>वाद अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u> -

मौजे गडहिंग्लज येथील दावा कलम १ मध्ये नमुद केलेल्या जमिन मिळकती ह्या या अर्जाचा व दाव्याचा मुख्य वाद विषय आहे.

३. वादीने असे कथन केले की, दाव्यात नमुद केलेल्या वर्णनानुसार दावा मिळकतीमध्ये वादींची कब्जे वहिवाट आहे. या मिळकतीसंदर्भात रे.क.नं. ३९/२०१५ हा वाटपाकरीता प्रतिवादी क्र. १, ३, ५ व ७ ते ९ यांचे विरुध्द दाखल केलेला होता. सदरचा दावा तडजोडीने निकाली करणेत आला. त्या तडजोडीमध्ये नमुद केल्याप्रमाणे दावा मिळकती या वादीच्या हिस्सेस देणेत आल्या आहेत व तसा वादीचा प्रत्यक्ष कब्जा आहे. तसेच तडजोडीप्रमाणे ७/१२ स नोंदी होणेकरीता मा. तहसलिदार, गडहिंग्लज यांचेकडे अर्ज सादर केला होता व तो अर्जही नामंजूर करण्यात आला. त्यामुळे वादीने दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, यांचेकडे दावा दाखल केला आहे व तो प्रलंबित आहे. रे.क.नं. ३९/२०१५ मधील तडजोड हुकूमनाम्याप्रमाणे दावा मिळकत ही मालकी हक्काने वादीच्या कब्जे वहिवाटीस असताना केवळ ७/१२ पत्रकी नोंद नसल्याचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी हे वादीच्या दावा मिळकतीमधील शांततामय कब्जे वहिवाटीस अडथळा करीत आहेत तसेच वादीस दावा मिळकतीमधून हुसकावून लावण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे वादीने प्रतिवादींच्या विरुध्द तुर्तातुर्त ताकीदीची मागणी केली आहे.

४. प्रतिवादींनी निशाणी क्रमांक २५ वर आपली कैफीयत व निशाणी क्रमांक ५ ला एकत्रात म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी दाव्यातील कथन नाकारले आहे. त्यानी थोडक्यात असे कथन केले की, वादीने रे.क.नं. ३९/२०१५ मधील तडजोड हुकूमनाम्यातील अटींची पुर्तता न करता ताकीदीची मागणी केली असल्याने दावा व अर्ज चालणेस पात्र नाही. रे.क.नं. ३९/२०१५ मधील हुकूमनाम्याप्रमाणे अद्याप नोंद झालेला

नसून पुर्वीच्या आणेवारीप्रमाणे नोंदी आहेत. दावा मिळकतीपैकी अनुक्रमांक ५ ते ७ ह्या आजतागायत वादी व प्रतिवादी सोईनुसार कसत असून सर्वांची समाईकात कब्जे वहिवाट आहे. मात्र अनुक्रमांक १ ते ४ ह्या दावा मिळकती वादी क्र. १ ते ३ यांना समाईकात पूर्ण मालकी हक्काने त्यांचा असलेला पुर्वीचा कब्जा कायम करुन दिलेला असून त्याप्रमाणे सदर मिळकती ह्या वादीच्या कब्जे वहिवाटीस असून प्रतिवादी यांनी त्यातील हक्क कायमपणे सोडून दिलेला आहे. दावा मिळकतीच्या चतुर्सिमा बरोबर दिलेल्या नाहीत. तसेच रे.क.नं. ३९/२०१५ मधील हुकूमनाम्याप्रमाणे रि.स.नं. ६४५, ६४६ व ७५६ ची मोजणी भुमि अभिलेख, कार्यालयामार्फत समान हिस्याने फी ची भरणा करुन ज्याचे त्याचे मालकीचे क्षेत्र मोजणी करुन क्षेत्राची मालक नात्याने स्वतत्र कब्जे वहिवाट करणेची अट नमूद केलेली आहे. परंतु वादीने मोजणीकरीता प्रयत्न केले नाहीत. मात्र सदर क्षेत्रामध्ये वादीने अचानकपणे शिरकाव करुन नांगरट करण्याचा प्रयत्न करु लागले आहेत. सबब प्रतिवादींनी अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

**५.** वादीतर्फे विधीज्ञ श्री . एम.व्ही.पाटील व प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री . एस.के.जमादार यांचा विस्तृत युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दाखल सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले.

**६.** अर्जाच्या निर्गतीच्या दृष्टीने खालील वादप्रश्न माझ्या विचारार्थ उपस्थित झाले. त्याचे कारणासहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीला सकृतदर्शनी केस आहे काय ? | **नकारार्थी** |
| 2 | न्यायाचा समतोल वादीचे बाजुने आहे काय ? | **नकारार्थी** |
| 3 | मनाई नाकारल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल काय ? | **नकारार्थी** |
| ४. | काय आदेश ? | **अर्ज नामंजुर करणेत येत आहे.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

### <u>वादप्रश्न क्रमांक १ ते ३ बाबत</u> -

**७.** वरील तिन्ही वादप्रश्न एकमेकाशी संलग्न असल्याने व त्यांची वारंवार होणारी चर्चा टाळणेकरिता सर्व वादप्रश्न एकत्रीतपणे चर्चीले आहेत . उभय पक्षांनी दाखल केले कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन केले.

८. वादी व प्रतिवादी यांचे कथन पाहता त्यांनी रे.क.नं. ३९/२०१५ मध्ये तडजोड झाल्याचे मान्य केलेले आहे. तसेच कैफीयतीमध्ये प्रतिवादी असेही मान्य केले की, दावा मिळकत क्र. १ ते ४ या सदर तडजोडीनुसार वादी क्र. १ ते ३ च्या हिस्यास व कब्जे वहिवाटीस आहेत. मात्र दावा मिळकत सि.स.नं. ६४५, ६४६ व ७५६ याबाबत वाद उपस्थित केलेला आहे. सबब तडजोडीप्रमाणे वादीचा या मिळकतीमध्ये प्रत्यक्ष कब्जा आहे काय हे पाहणेकरीता तडजोडनाम्याच्या अटी पाहणे आवश्यक आहे. रे.क.नं. ३९/२०१५ मधील आपसी तडजोड हुकूमनामा पान क्र. ११ व १२ वर या तिन्ही मिळकतीबाबत वर्णन केलेल्या आहेत. त्यामध्ये रि.स.नं. ६४५ मधील दक्षिणेकडील भागाची ० हेक्टर ३४.८६ आर जमीन वादी क्र. १ व ० हेक्टर ३४.८५ आर वादी क्र. २ यांना देणेत आलेली आहे. त्यांच्या नोंदी देखील ७/१२ पत्रकास पुर्वीप्रमाणेच असल्याचे दिसून येत आहे. तसेच गट नं. ६४६ मधील पुर्वेकडील १ हेक्टर ६ आर व वादींनी त्या क्षेत्रामध्ये काढलेली नवीन विहीर पूर्ण मालकी व वहिवाटीच्या हक्कासह तसेच त्यामध्ये असलेल्या वादींच्या घरासह आणि प्रतिवादीच्या हिस्सयापैकी १० आर वाढीव जमीन ही वादी यांना देणेत आलेली आहे. त्याचप्रमाणे रि.स.नं. ७५६ पैकी ० हेक्टर ३५ आर जमीन वादींचे हिस्यात कायमपणे नियमीत केलेली आहे. यावरुन असे दिसते की, रि.स.नं. ६४५, ६४६ व ७५६ ही मिळकत पुर्वीच ७/१२ पत्रकी वादींच्या नावे होती व त्याप्रमाणे ती कायम करणेत आलेली आहे. विशेष म्हणजे तडजोड पान क्र. १२ मध्ये शेवटी असे नमुद केले आहे की, सदर शेतजमीन वादी क्र. १अ ते १ई व वादी नं. २ यांच्या हिस्सेस पूर्ण मालकी हक्काने कायमपणे कब्जा दिलेला आहे. त्यामुळे तडजोड हुकूमनामा पान क्र. १५ मध्ये रि.स.नं. ६४५, ६४६ व ७५६ च्या मोजणीबाबत उल्लेख असलातरी सदर जमीनी या प्रत्यक्षपणे कब्जा दिला असल्याचे तडजोडीत मान्य केलेले आहे. असे असलेतरी तडजोड हुकूमनामा पान क्र. १५ व कलम ३ मध्ये सदर मिळकती ह्या जिल्हा उपनिरीक्षक भूमि अभिलेख गडहिंग्लज यांचेमार्फत मोजणी करुन मोजणीअंती स्वतंत्र कब्जे व वहिवाट करणेची आहे असे नमूद आहे. परंतु त्याप्रमाणे वादी अगर प्रतिवादींनी जमीनीची मोजणी केलेबाबतचा पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे सदर २०१७ सालच्या तडजोडीनुसार प्रत्यक्षात ताबा देणेची प्रक्रिया पूर्ण झालेली दिसत नाही. त्यामुळे संपूर्ण तडजोडीचा मजकुर पाहता वादींची मालकी हक्क व कब्जे वहिवाट ही केवळ कागदोपत्री असल्याचे निष्पन्न होत आहे. वादींनी प्रतिवादी हरकत करत असल्याचे कथन केले आहे परंतु सदर मिळकतीमध्ये कोणती पिके आहेत व कोणत्या मिळकतीमध्ये कशा प्रकारची हरकत केली याबाबत वादीचे खुलासेवार कथन नाही. त्यामुळे ७/१२ वरील नोंदी व तडजोड हुकूमनामा पाहता अद्याप सदर मिळकती या स्वतंत्र झाल्याचे निष्पन्न होत नाही. त्यामुळे सह हिस्सेदाराविरुध्द ताकीद मंजूर करता येणार नाही. वादीने रे.क.नं. ३९/२०१५ प्रमाणे मोजणीची कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे वादीस प्रथमदर्शनी केस या दाव्यात नाही, वादीचे अपरिमीत नुकसान होईल असे दिसून येत नाही. परिणामतः

वादप्रश्न क्र. १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविंत आहे व वादप्रश्न क्र . ४ साठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज नामंजुर करणेत येतो.

२. अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालावर अवलंबून राहील.
(न्यायासनावर निवेदीत व अधिघोषीत करण्यात आला)

Maheshkumar Tanajirao Kharade

Digitally signed by Maheshkumar Tanajirao Kharade
Date: 2020.02.11 15:32:49 +0530

ठिकाण - गडहिंग्लज (म. ता. खराडे)
दिनांक - १०-०२-२०२० सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज